# मेट्रो-पश्चिम रेल्वेत सहकार्याचा पूल

## 'मुंबई सेंट्रल'साठी रेल्वे देणार जमीन

म. टा. विशेष प्रतिनिधी, मुंबई

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या मेट्रो-३ मार्गाच्या 'मुंबई सेंट्रल' मेट्रो स्टेशनसाठी पश्चिम रेल्वेची जागा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे मेट्रो-३ने पूर्वतयारीचा आणखी एक महत्त्वाचा टप्पा पूर्ण केला आहे. जवळपास ६२१४ चौरस मीटर जागा रेल्वेकडून मुंबई मेट्रोला तात्पुरत्या स्वरूपात दिली जाणार आहे.

मुंबई सेंट्रल मेट्रो स्टेशनच्या प्रवेशद्वारासाठी (एंट्री-एक्झिट) कॉर्पोरेशनला मुंबई सेंट्रल येथील पश्चिम रेल्वेची जागा हवी होती. त्यासंदर्भात पश्चिम रेल्वे प्रशासनाशी बोलणी चालू होती. ही बोलणी यशस्वी ठरली आहेत. मेट्रोला ही जमीन स्टेशन प्रवेशद्वाराचे बांधकाम तसेच बांधकामासाठी लागणारी यंत्रसामुग्री ठेवण्यासाठी आवश्यक आहे. मेट्रो-३साठी आवश्यक असणाऱ्या जमीन संपादनाचे काम जवळपास ८५ टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे प्रकल्पाला आणखी गती मिळेल.



### असा असेल बांधकामाचा टप्पा

सीप्झ ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स हा टप्पा जून, २०१९पर्यंत पूर्ण करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. त्यानंतर वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स ते सायन्स म्युझियम हा टप्पा डिसेंबर, २०१९ आणि त्यानंतरचा कफ परेडपर्यंतचा अंतिम टप्पा एप्रिल, २०२०पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे.

### मेट्रो कोचसाठी हालचाली

प्रकल्प वेळेत पूर्ण व्हावा म्हणून जमीन संपादन तसेच अन्य बाबींची पूर्तता करण्याचे काम प्रगतिपथावर असून मेट्रो कोचही वेळेत तयार व्हावेत याकरिता पावले उचलण्यात येत आहेत. मेट्रोचे सहा कोच आणि ३५ डबे तयार करण्यासाठी कार्यवाही सुरू आहे. त्यासाठी अंदाजे दोन हजार कोटी रुपयांच्या आसपास खर्च येईल.

### विधान भवन स्टेशनचा तिढा कायमच

मेट्रोच्या विधान भवन स्टेशनसाठी न्यायाधीशांच्या 'सारंग' या निवासस्थानालगतची काही जागा आवश्यक आहे. त्यासंदर्भात गेल्या अडीच महिन्यांत तीन बैठका झाल्या आहेत. परंतु हा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे.